**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. महाडीबीटी-२०२३-२४/(RIGHT TO GIVE UP)/शिष्यवृत्ती शाखा/ 6903 दिनांक : २६.०६.२०२४

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे/ कालमर्यादित**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - महाडीबीटी पोर्टल वर अर्ज करतेवेळी चुकून Right to Give Up Option हे बटन दाबले गेल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना Revert Option उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच याकरिता महाडीबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ३०.०६.२०२४ रोजीपर्यंत वाढविण्याबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं शिष्यवृत्ती/ डीबीटी- Give it up subsidy/२०२४ दि. २४.०६.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आले आहे. महाडीबीटी पोर्टलवर **Right to Give Up Option** या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज प्रिंसिपल लॉगिनला परत करण्याबाबत आणि सदर अर्जाची महाविद्यालय स्तरावर तपासणी करुन सदर विद्यार्थ्यांना पुन:श्च महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्याची सवलत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने मान्यता दिलेली आहे. **ही संधी एकदाच व अंतिम स्वरुपात देण्यात आलेली आहे. तरी सर्व विद्यापीठ/ संस्था / विद्यापीठ स्तरावरुन याबाबत सर्व विद्यार्थ्यांपर्यंत सूचनाफलकाद्वारे, सर्व सोशल माध्यमाद्वारे सविस्तर माहिती पोहोचवावी. दि. ३०.०६.२०२४ नंतर ही सुविधा बंद करण्यात येईल. तरी सर्व सर्व विद्यापीठ/ संस्था / विद्यापीठ स्तरावरुन विद्यार्थ्यांना याबाबत कळवून दि. ३०.०६.२०२४ पूर्वी Right to Give Up Option या पर्यायाचे बटण नजरचुकीने अथवा अनावधानाने निवडलेल्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज तपासणी करुन पुढे पाठवावे.** जेणेकरुन कोणताही पात्र विद्यार्थी ऑनलाईन ॲप्लिकेशन केलेल्या शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही.

**(डॉ. केशव तुपे)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे